**सुभाषित:**
भिक्षाशनं भवनमायतनैकदेशः शय्या भुवः परिजनो निजदेहभारः ।
वासश्च जीर्णपटखण्डनिबद्धकन्था हा हा तथापि विषयान्न जहाति चेतः ||

**अर्थ:**
जेवण भिक्षा मागून; घर म्हणजे बसलोय तेवढी जागा; अंथरूण जमीन; आपलं स्वतःचं शरीर हाच नोकरवर्ग; जुन्या फाटक्या चिंध्यांची गोधडी एवढेच कपडे (इतकंच पुरे असतं) तरीही, अरेरे! मन विषयांचा त्याग करत नाही. (विषयांमध्ये घोटाळतंय!)